# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION


बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८/२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


**सहायक प्रशासकीय अधिकारी , महाराष्ट्र भूजल सेवा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गट-ब**

**धारिका क्रमांक : १७७९(३५)/७१/पंधरा.**

**जाहिरात क्रमांक : ११/२०१०**

आयोगामार्फत सहायक प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र भूजल सेवा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गट-ब पदावरील भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सहायक प्रशासकीयअधिकारी, महाराष्ट्र भूजल सेवा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गट-ब एकूण पदे -२ | १ | १ | - | - | - | - | - | - | - |

**१)** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनूसार बदल होण्याची शक्यता आहे. **२)** शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, क्र. आपना१००४/प्र.क्र.१५६/पापु १५, दिनांक १३ फेब्रुवारी, २००६ खालील अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत :- **(१)** अंध + अल्पदृष्टी (PS) **(२)** कर्णबधिर (PD) **(३)** अस्थिव्यंग (BL/OA )

**३. वेतनश्रेणी- रु.९,३००-३४,८०० + ग्रेड पे रु. ४४००** एकत्रित अंदाजित वेतन रु.२१५०९/-

**४. पात्रता :- ४.१** भारतीय नागरिक. **४.२** वय:- **(१) दिनांक १ मार्च, २०११** रोजी ३५ वर्षे, मागासवर्गीयांसाठी ४० वर्षे **(३)** शासन सेवेतील उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा लागू नाही. **(४)** अपवादात्मक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांना वयोमर्यादेत सूट देय. **(५)** शासन आदेशानुसार माजी सैनीक, अपंग व खेळाडूसाठी इत्यादिसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. **४.३ शैक्षणिक अर्हता :- (१)** मान्यताप्राप्त विद्यापिठाची कला, विज्ञान, वाणिज्य, विधी किंवा कृषि मधील पदवी किंवा तत्सम अर्हता आणि तद्नंतर **४.४ अनुभव :-** महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही विभागात किंवा स्थानिक प्राधिकरणात किंवा औद्योगिक / व्यापारी संस्थेत पर्यवेक्षकीय पदावरील तीन वर्षांचा अनुभव. **४.५ प्राधान्यशील अर्हता :- १)** मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी किंवा **२)** मोठया औद्योगिक/ व्यावसायिक आस्थापनेवरील प्रशासकीय अनुभव आणि रचना कार्यपद्धतीचा अनुभव.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून केवळ किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोयीस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६.** कर्तव्ये व जबाबदा-या :- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशिल आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत,आवश्यक अर्हता,आरक्षण,वयोमर्यादा,शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना,अभ्यासक्रम,इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "**मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे.आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**८. शुल्क : (१)** अमागास - रु. ४१०/- **(२)** मागासवर्गीय - रु. २१०/- **(३)** सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**९. अर्ज करण्याची पद्धत :- (१)** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.**(२)**पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २ नोव्हेंबर, २०१० ते दिनांक ३० नोव्हेंबर,२०१०** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.**(३)** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल. **(४)** विहित पद्धतीने दोन्ही टप्यातील अर्ज सादर करण्याची ( ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे). संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे. **(५)** ऑनलाईन पद्धतीन अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत ( Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी. x उंची ४.५ से.मी.) व स्वतःचा ई-मेलआयडी असणे आवश्यक आहे तसेच स्वतःचा स्वाक्षरी व फोटो आयोगाच्या सूचनेनूसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. **(४) मदत :-** अर्जाच्या ऑनलाईन स्वीकृतीच्या व्यवस्थेसाठी आयोगाने मे. वास्ट इंडिया प्रा. लि. या संस्थेची नियुक्ती केली असून, सदर संस्थेने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांच्या सोयीकरिता महाराष्ट्रातील तालुका स्तरावर व विविध प्रमुख शहरांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकृती केंद्र [Online Application Centre (OAC)] निश्चित केली आहेत. सदर केंद्रांची मदत उमेदवारांना घेता येईल. अशा केंद्रांची (OAC) ची यादी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह उपलब्ध आहे. अधिकृत केंद्राचा पत्ता व मदत ९७५७४४४०२० या दूरध्वनी क्रमांकावरुन उपलब्ध करुन घेता येईल. या केंद्रांवर उपलब्ध करुन देण्यात येणा-या सुविधेकरीता उमेदवाराला प्रत्येक परीक्षा / भरतीसाठी आयोगास अदा करावयाच्या शुल्काव्यतिरिक्त रु.२४/- इतकी रक्कम सर्व्हिस चार्जेस म्हणून रोखीने संबंधित केंद्रचालकास अदा करावी लागेल. सदर मदत केंद्र संबंधित संस्थेने उमेदवारांच्या सोयीसाठी निश्चित केलेली असल्यामुळे आयोगाचा सदर केंद्रांशी काहीही संबंध नाही.

**१०.** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यातील ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही **दिनांक ३० नोव्हेंबर, २०१०** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बंद करण्यात येईल.

**११.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in व www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**मुंबई :**
**दिनांक : २ नोव्हेंबर, २०१०.**

**तु. अ . पवार**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारिरीक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**